→ शहर परिसर

# जोशी इन्स्टिट्यूट, 'क्विक हिल' फाउंडेशनमध्ये सामंजस्य करार

पुणे : महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के बी जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व 'क्विक हिल' फाउंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. त्या अंतर्गत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' माहिती, जागरूकता या विषयावर प्रशिक्षण झाले. यावेळी फाउंडेशनचे सुगंधा दाणी, गायत्री पवार, महाराष्ट्र सायबरचे पोलिस उपनिरीक्षक चित्रा चौधरी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये सोशल नेटवर्किंग साइट वापरताना घ्यायची काळजी, सायबर गुन्ह्यांविषयी माहिती दिली असून शंभर विद्यार्थिनींनी प्रशिक्षण घेतले. या कार्यक्रमासाठी प्राचार्या डॉ. स्वाती सायनकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. कल्याणी नामजोशी व प्रा. मनाली सपकाळ यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.